IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# धाराशिव जिल्ह्यातील पारधी जमातीतील महिला व शासकीय योजना

**श्रीमती. सारिका उद्धवराव पडवळ**

**संशोधक,**

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर

## सारांश :

भारत हा विविध जाती जमातींनी मिळून बनलेला देश असून आफ्रिकेनंतर सर्वात जास्त आदिवासी लोकसंख्या भारतात आहे. भारतामध्ये एकूण ७०५ आदिवासी जमाती वास्तव्य करत असून या आदिवासी जमाती संपूर्ण भारतभर पसरलेल्या असून ते ११६ भाषा तर ४०० बोलीभाषांचा वापर करत आहेत. महाराष्ट्र राज्यात पारधी ही एक अनुसूचित जमात आहे.

पारधी जमात अनुसूचित जमातीमध्ये मोडत असल्यामुळे आदिवासी व अनुसूचित जमातीच्या विकासाच्या सर्व योजना पारधी जमातीला लागू आहेत. मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे पारधी जमातीतील लोकांना त्याचा लाभ मिळत नव्हता त्यासाठी पारधी जमातीसाठी जिल्हास्तरीय योजनांची तरतूद करण्यात आली आहे.

**मुख्य शब्द: पारधी जमात, शासकीय योजना, अंमलबजावणी**

## प्रस्तावना:

पुरातन काळापासून जात एक संस्था व व्यवस्था म्हणून भारतीय समाज जीवनाचे अपरिहार्य अंग बनले असल्यामुळे जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक धर्मात कमी जास्त प्रमाणात जातीव्यवस्थेचे अस्तित्व दिसून येते आणि जातीव्यवस्थेच्या आधारावर भारतीय समाजाची विभागणी झाली आहे व त्यातून श्रेणीबद्ध रचना उदयास आली आहे. श्रेष्ठ- कनिष्ट भावना, जातीय हितसंबंध यातून काही प्रमाणात जातीय संघर्ष निर्माण होण्यास सुरवात झाली आहे. प्रत्येक जातीचे वैशिष्ट्ये, आचरण पद्धती, विवाह पद्धती या वेगळ्याअसतात. व्यक्ती ज्या जातीत जन्माला येतो त्या जातीचे नियम काटेकोरपणे पाळण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे भारतातील जातीव्यवस्था अधिक ताठर बनली आहे. व्यक्तीचे संपूर्ण जीवन जातीव्यवस्थेने व्यापलेले व नियंत्रित केलेले आहे. भारतामध्ये जातींच्या संख्येविषयी विचारवंताच्या

मतामध्ये भिन्नता असली तरी भारतात साधारणे ६००० पेक्षा जास्त जाती-उपजाती आहेत. भारत हा विविध जाती जमातींनी मिळून बनलेला देश असून आफ्रिकेनंतर सर्वात जास्त आदिवासी लोकसंख्या भारतात आहे.

भारतामध्ये एकूण ७०५ आदिवासी जमाती वास्तव्य करत असून या आदिवासी जमाती संपूर्ण भारतभर पसरलेल्या असून ते ११६ भाषा तर ४०० बोलीभाषांचा वापर करत आहेत. महाराष्ट्र राज्यात पारधी ही एक अनुसूचित जमात आहे. पारधी जमात अनुसूचित जमातीमध्ये मोडत असल्यामुळे आदिवासी व अनुसूचित जमातीच्या विकासाच्या सर्व योजना पारधी जमातीला लागू आहेत. मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे पारधी जमातीतील लोकांना त्याचा लाभ मिळत नव्हता त्यासाठी पारधी जमातीसाठी जिल्हास्तरीय योजनांची तरतूद करण्यात आली आहे.

## अभ्यासाचे उद्दिष्टे :

१. पारधी जमातीसाठी असलेल्या जिल्हास्तरीय शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

२. पारधी जमातीसाठी असलेल्या शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती :

सदरचा संशोधन लेख लिहिण्यासाठी प्राथमिक व व्दितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. सदर व्दितीय माहिती प्राप्त करण्यासाठी विविध अहवाल, पुस्तके, संशोधन लेख व संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे. तर प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी मुलाखत अनुसुचीचा वापर केला आहे .

## विश्लेषण :

## पारधी जमातीसाठीच्या जिल्हास्तरीय शासकीय योजना

पारधी जमात अनुसूचित जमातीमध्ये मोडत असल्यामुळे आदिवासी व अनुसूचित जमातीच्या विकासाच्या सर्व योजना पारधी जमातीला लागू आहेत. मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे पारधी जमातीतील लोकांना त्याचा लाभ मिळत नव्हता त्यासाठी पारधी जमातीसाठी जिल्हास्तरीय योजनांची तरतूद करण्यात आली आहे.

### १. पारधी आवास योजना

राज्यातील फक्त पारधी जमातीसाठी पारधी आवास योजन आदिवासी विभागामार्फत सन २०१६ पासून सुरु करण्यात आली आहे.लाभार्थांची निवड ग्रामसभेमार्फत तर अंतिम निवड जिल्हास्तरीय समितीमार्फत केली जाते. या योजनेमध्ये पारधी जमातीतील कुटुंबाना घर बांधण्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रासाठी १,२०,००० रुपये तर नक्षलग्रस्त व डोंगराळ भागाकरिता १,३१,००० रुपये अनुदान लाभार्थीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. सदर योजनेमुळे पारधी जमातीतील लोकांना त्यांचे हक्काचे घर मिळण्यासाठी मदत होत आहे.

**२. भूमिहिन पारधी जमातीच्या कुटुंबाना स्वाभिमान/सबळीकरण योजना**

या योजनेंतर्गत भूमिहिन पारधी जमातीच्या कुटुंबाना २ एकर बागायती किंवा ४ एकर जिरायती शेत जमीन दिली जाते. यामुळे पारधी पारधी जमात एका ठिकाणी स्थिर होईल त्यांचे भटकंती जीवन संपुष्टात येईल . मात्र सदर योजेनेला अतिशय कमी प्रमाणात यश प्राप्त झाले आहे .

**३. पारधी कुटुंबाना व्यवसायासाठी शेळीगटाचा पुरवठा करणे**

पारधी कुटुंबाच्या उत्पनात वाढ करण्यासाठी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पारधी कुटुंबाना १० शेळ्या व १ बोकड संच देण्यात येतो. यामुळे पारधी कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होवू शकते.

**४. आदिवासी पारधी शेतकऱ्यांना विहीर, मोटरपंप व पाईपलाईन**

कोरडवाहू शेतीमधून पुरेसे उत्पन्न होत नसल्यामुळे आदिवासी पारधी शेतकऱ्यांना या योजनेच्या माध्यमातून विहीर, मोटरपंप व पाईपलाईन देण्याची तरतूद आहे

**५. इतर महत्वाच्या योजना**

व्यवसायासाठी दुधाळ जनावरे २ म्हशी पुरवठा करणे, पिठाची गिरणी शेडसह बसवून देणे, सायकल दुकनासाठी सायकलचा पुरवठा करणे, मळणी यंत्राचा पुरवठा करणे, स्वयंरोजगार अंतर्गत किराणा दुकान, स्टेशनरी दुकनासाठी अर्थसहाय्य देणे, शिवण कलेचे प्रशिक्षण देऊन शिवण यंत्राचा पुरवठा करणे कृषि निविष्टा, शेती औजारे पुरविणे, पारधी युवाकांना त्यांच्या पसंतीनुसार रोजगारासाठी अर्थसहाय्य करणे, इमु पालन व्यवसायाचे प्रशिक्षण इमु पालन करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, व्यवसायासाठी स्टालचा पुरवठा करणे व पारधी समाजात प्रबोधन करण्यासाठी जाणीव जागृती मेळाव्यांचे आयोजन करणे.

## धाराशिव जिल्ह्यातील पारधी जमातीसाठी असलेल्या शासकीय योजनांची अंमलबजावणी

पारधी जमातीच्या विकासाठी जिल्हास्तरीय योजनेंतर्गत वरील योजना राबविण्यात येत असून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता २२.७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजना राबवीत असताना कोणत्याही वस्तूंच्या स्वरूपात लाभार्थ्यांना सहाय्य दिले जाते तेंव्हा त्या वस्तूचा दर्जा उत्कृष राखण्याची काळजी घेतली पाहिजे. तसेच लाभार्थाना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण सहाय्य करणे आवश्यक आहे. मात्र पारधी समाजाला दिल्या जाणाऱ्या योजनेमध्ये दर्जा हा योजना यशातील मुख्य अडसर ठरत आहे. घरकुले व शेळी वाटप या योजना ठेकेदारांच्या विलाखातून सोडविणे आवश्यक आहे तसेच ज्या योजनेत अनुदान दिले जाते त्याचा योग्य विनियोग होतो कि नाही याकडे आदिवासी विकास कार्यालयाच्या निरीक्षणे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. तरच या योनानाचा खराखुरा लाभ मिळण्यातील अडचणी दूर होतील.

पारधी जमातीच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी शासनाने वरील वेगवेगळ्या योजना सुरू केल्या आहेत; परंतु त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे पारधी जमातीचे प्रश्न आज देखील सुटलेले नाहीत.

पारधी जमातीचे शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे काळाची गरज असल्याचे नमूद केले आहे. केंद्र व महाराष्ट्र शासन समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करत आहे. मात्र शासकीय योजनांची माहिती नसल्यामुळे वंचित घटक या योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. धाराशिव जिल्ह्यातील किती टक्के पारधी स्त्रियांना शासकीय योजनांची माहिती आहे या गोष्टीचा आढावा खालील तक्त्यात घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र .१**

**पारधी स्त्रियांची शासकीय योजना माहित असण्याची स्थिती**

| तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| योजना माहीत असणाऱ्या पारधी महिला | ४७ | १५.६६ |
| योजना माहीत नसणाऱ्या पारधी महिला | २५३ | ८४.३४ |
| **एकूण** | **३००** | **१००** |

स्रोत : मुलाखत अनुसूचीच्या आधारे

वरील तक्ता क्र १ वरून दिसून येते की, धाराशिव जिल्ह्यातील एकूण ३०० पारधी महिलांपैकी फक्त ४७ म्हणजेच १५.६६ टक्के पारधी महिलांना शासकीय योजनांची माहिती आहे तर २५३ म्हणजेच ८४.३४ टक्के पारधी महिलांना शासकीय योजनांची माहिती नसल्याचे दिसून आले आहे. यावरून स्पष्ट होते की, धाराशिव जिल्ह्यातील १५.६६ टक्के पारधी महिलांची शासकीय योजनांची माहिती आहे तर ८४.३४ टक्के पारधी महिलांना शासकीय योजनांची माहिती नाही. शासकीय योजनांची माहिती नसल्यामुळे पारधी महिला शासकीय लाभ मिळण्यापासून वंचित राहत आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील किती टक्के पारधी महिलांनी शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे; याबाबतचा अभ्यास तक्ता क्र २ मध्ये करण्यात आला आहे.

**तक्ता क्र .२**

**पारधी महिलांची शासकीय योजनेचा लाभ घेण्याची स्थिती**

| तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| लाभ घेतलेल्या पारधी महिला | ६० | २०.०० |
| लाभ न घेतलेले पारधी महिला | २४० | ८०.०० |
| **एकूण** | **३००** | **१००** |

स्रोत : मुलाखत अनुसूचीच्या आधारे

धाराशिव जिल्ह्यातील ३०० पारधी स्त्रियांपैकी फक्त ६० पारधी स्त्रियांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला असून त्यांचे शेकडा प्रमाण २०.०० टक्के आहे तर शासकीय योजनांचा लाभ न घेतलेल्या पारधी स्त्रियांची संख्या २४० एवढी असून त्यांचे शेकडा प्रमाण ८०.०० टक्के आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, उस्मनाबाद जिल्ह्यातील फक्त २०.००

टक्के पारधी स्त्रियांनी शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे तर ८०.०० टक्के पारधी स्त्रियांनी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळाला नाही.

धाराशिव जिल्ह्यात ८०.०० टक्के पारधी स्त्रियांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे वरील निष्कर्षावरून दिसून येत आहे. त्यामुळे पारधी स्त्रियांना शासकीय योजनेचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास तक्ता क्र ३ मध्ये करण्यात आला आहे.

**तक्ता क्र .३**

**पारधी महिलांना शासकीय योजनेचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी**

| कारण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| योजना माहितीचा अभाव | ९० | २७.४३ |
| कागदपत्रांची अडचण | ७९ | २४.०८ |
| योजना अंमलबजावणीत दिरंगाई | ७१ | २१.६७ |
| जाचक अटी | ४० | १२.१९ |
| लोकप्रतिनिधी व शासकीय कर्मचारी सहकार्य अभाव | ४८ | १४.६३ |

स्रोत : मुलाखत अनुसूचीच्या आधारे

तक्ता क्र ३ वरून दिसून येते की, धाराशिव जिल्ह्यातील पारधी महिला वेगवेगळ्या कारणांमुळे शासकीय योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित रहात आहेत. धाराशिव जिल्ह्यातील २७.४४ टक्के पारधी महिला योजनेची माहिती नसल्यामुळे, २४.०८ टक्के पारधी महिला कागदपत्रांची अडचण असल्यामुळे, २१.६७ टक्के पारधी महिला योजना अंमलबजावणीत दिरंगाई होत असल्यामुळे, १२.१९ टक्के पारधी महिला जाचक अटीमुळे तर १४.६३ टक्के पारधी महिला गावातील लोकप्रतिनिधी व शासकीय कर्मचारी यांचे सहकार्य मिळत नसल्यामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, धाराशिव जिल्ह्यातील २७.४४ टक्के पारधी महिला योजनेची माहिती नसल्यामुळे, २४.०८ टक्के पारधी महिला कागदपत्रांची अडचण असल्यामुळे, २१.६७ टक्के पारधी महिला योजना अंमलबजावणीत दिरंगाई होत असल्यामुळे, १२.१९ टक्के पारधी महिला जाचक अटीमुळे तर १४.६३ टक्के पारधी महिलांना गावातील लोकप्रतिनिधी व शासकीय कर्मचारी यांचे सहकार्य मिळत नसल्यामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही.

महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी व त्यांच्या संरक्षणासाठी केंद्र व राज्य सरकार यांचेकडून स्वतंत्र्य योजना व कायदा करण्यात येतात.मात्र महिलांसाठी असलेल्या योजनांची व कायद्यांची माहिती नसल्यामुळे महिला आर्थिक व सामाजिक विकासासापासून वंचित राहतात.

शासन राबवीत असलेल्या शासकीय योजनामुळे धाराशिव जिल्ह्यातील पारधी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये काही सुधारणा झाली आहे का यासंदर्भात पारधी महिलांचा मतांचा अभ्यास खालील तक्ता क्र. ४ मध्ये करण्यात आला आहे.

**तक्ता क्र .४**

**शासकीय योजनांचा पारधी महिलांच्या विकासावरील परिणाम**

| तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| नाही | २१९ | ७३.०० |
| होय | ८१ | २७.०० |
| **एकूण** | **३००** | **१००** |

स्रोत : मुलाखत अनुसूचीच्या आधारे

वरील तक्ता क्र ४ मध्ये शासकीय योजनांचा धाराशिव जिल्ह्यातील पारधी महिलांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर होत असलेले परिणाम दर्शविण्यात आला आहे. वरील तक्त्यावरून दिसून येते की, धाराशिव जिल्ह्यातील ३०० पारधी महिलांपैक २१९ पारधी महिलांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली नसून त्यांचे शेकडा प्रमाण ७३.०० टक्के एवढे आहे तर फक्त ८१ पारधी महिलांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारणा झाली असून त्यांचे शेकडा प्रमाण फक्त २७.०० टक्के असल्याचे दिसून आले आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, शासकीय योजनेमुळे धाराशिव जिल्ह्यातील फक्त २७.०० टक्के पारधी महिलांच्या सामाजिक व आर्थिक परीस्थितीत सुधारणा झाली आहे तर ७३.०० टक्के पारधी महिलांच्या सामाजिक व आर्थिक परीस्थितीत कोणत्याही स्वरूपाचा बदल झालेला नाही.

शिक्षणाचे प्रमाण कमी, शासकीय योजनेच्या माहितीचा अभाव, कागदपत्रांची अडचण, जाचक अटी या विविध कारणामुळे पारधी महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यामुळे पारधी समाजातील महिला आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास राहत आहेत. पारधी जमातीतील महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व शासकीय योजना पारधी महिलापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पारधी महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीत सुधारणा करण्यासाठी शासनाने स्वतंत्र योजना तयार करून त्या योजनांची योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१ गायकवाड पी.के. आणि जाधव व्ही.व्ही. (२०१७), 'पारधी समाज आणि स्त्री जीवन : एक दृष्टीकोन', पुणे रिसर्च स्कॉलर अन इंटरनशनल मल्टी डिसीप्लेनरी जर्नल, (३)१

२ पाटील एस (२०२२) , आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी शासनाच्या विविध योजना , महासंवाद, माहिती व जन संपर्क महासंचालानयल महाराष्ट्र शासन

३ आदिवासी विकास विभाग (२०१९), विभागाच्या योजनांची माहिती पुस्तिका सन २०१९-२० महाराष्ट्र शासन , मुंबई

४ आदिवासी विकास विभाग (२००८), शासन निर्णय – पारधी समाजासाठी घ्यावयाच्या विविध योजनांसाठी निधी मंजूर करणे, महाराष्ट्र शासन, मुंबई

५ आदिवासी विकास विभाग (२०२३), कार्यक्रम अंदाजपत्रक २०२३-२४, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय , नागपूर

६ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पारधी समाजासाठी राबविलेल्या योजनाचे मूल्यमापन, आदिवासी विकास विभाग, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे retrieved from https://trti.maharashtra.gov.in

७ कुलकर्णी एस. (२०११), 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन,पुणे

८ बरडे-मालपाणी एस (२०१८), पारधी जमात : दशा आणि दिशा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

९ पवार डी. (२०१४), पारधी समाजाचे अंतरंग , साईनाथ प्रकाशन , नागपूर